2 5 JUN 2026

सकाळ

# थ्री-डी स्कॅनिंग प्रणालीतून कृत्रिम अवयवाची निर्मिती

## विद्यापीठात डॉ. निरंजन देशमुख यांचे संशोधन

कोल्हापूर, ता. २४ : अत्याधुनिक थ्री-डी स्कॅनिंग प्रणालीच्या माध्यमातून कृत्रिम अवयव निर्मितीसाठीची मॅट्रिक्स मेथड सीएनसी मशीन शिवाजी विद्यापीठात डॉ. निरंजन सुधाकर देशमुख यांनी विकसित केले आहे.

डॉ. देशमुख यांनी विकसित केलेली 'मॅट्रिक्स मेथड' ही कृत्रिम अवयव अचूक, आरामदायी आणि रुग्णानुकूल बनवण्यास मदत करणार आहे. याचे डिझाइन पेटंट त्यांना मिळाले आहे. यामुळे कृत्रिम अवयव वापरणाऱ्या रुग्णांना अधिक चांगले फिटिंग, जास्त आराम, उत्कृष्ट कार्यक्षमता, आकर्षक स्वरूप मिळण्यास मदत होणार आहे. त्यांनी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाला मशीन भेट दिले. डॉ. अजित कोळेकर, डॉ. प्रवीण प्रभू आदी उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. तोडकर, डॉ. एस. एच. सावंत यांचे मार्गदर्शन लाभले.

### अचूक डिजिटल मोजमाप

गुंतागुंतीच्या भागांचे अचूक डिजिटल मोजमाप मॅट्रिक्स मेथड ही प्रणाली थ्री-डी ॲक्सिस सीएनसी मशीनवर आधारित आहे. शरीराच्या पृष्ठभागाचे मोजमाप शारीरिक स्पर्शाशिवाय करते. इन्फ्रारेड प्रकाशकिरणांच्या साहाय्याने शरीराच्या नाजूक आणि गुंतागुंतीच्या भागांचेही अचूक डिजिटल मोजमाप करता येते. त्यामुळे पारंपरिक पद्धतीतील गैरसोय, वेळ, संसर्गाचा धोका कमी होतो. हे मॉडेल कॅड, एफईए सारख्या अभियांत्रिकी विश्लेषणासाठी उपयोगी ठरते, अशी माहिती डॉ. देशमुख यांनी दिली.



विद्यापीठातील संशोधक डॉ. देशमुख यांनी विकसित केलेले हे तंत्रज्ञान संशोधन आणि समाजोपयोगी नवकल्पनांचा उत्कृष्ट नमुना आहे. स्कूलला मिळालेल्या या उपकरणामुळे विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव, संशोधनाला नवी दिशा मिळेल.

**- डॉ. अजित कोळेकर,** प्रभारी संचालक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JUN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण केंद्राला गोवा विद्यापीठाच्या शिष्टमंडळाची भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गोवा विद्यापीठाच्या वरिष्ठ शिष्टमंडळाने शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राला भेट दिली. ऑनलाईन शिक्षण व्यवस्था, दूरस्थ शिक्षण परिषद मान्यता प्रक्रिया, व्यवस्थापन व ई-कंटेंट विकासाबाबत माहिती घेतली.

गोवा विद्यापीठात ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय, शैक्षणिक व तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी ही भेट आयोजित केली होती. शिष्टमंडळात कुलसचिव प्रा. सुंदर धुरी, प्रा. रामराव वाघ, डॉ. समीर पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. बैठकीत डीईबी मान्यता, एलएमएस अंमलबजावणी, गुणवत्ताविषयक निकष, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शैक्षणिक साधने, विद्यार्थी सहाय्य व्यवस्था आणि गुणवत्तापूर्ण ई-कंटेंट विकास यावर चर्चा झाली. विद्यार्थी सहभाग वाढविण्याच्या सर्वोत्तम कार्यपद्धतींची देवाणघेवाण करण्यात आली. यावेळी या प्रसंगी झालेल्या बैठकीस कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर, आयटी प्रशासक कल्याण देवरुखकर, उपकुलसचिव विनय शिंदे, डॉ. चांगदेव बंडगर, डॉ. केतकी पवार, संग्राम महाडिक उपस्थित होते.

25 JUN 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात २७ रोजी अभियांत्रिकी प्रवेश मार्गदर्शन

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण होऊन अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेबाबत शनिवार दि. २७ रोजी मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती स्कूलचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी दिली.

डॉ. कोळेकर म्हणाले, यावेळी नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ई-स्क्रुटिनी, मेरिट लिस्ट, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत, प्रवेशाच्या विविध फेऱ्या, महाविद्यालय व शाखा निवडीचे निकष, शुल्क संरचना तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. चर्चासत्रात स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. गणेश पाटील मार्गदर्शन करणार आहेत, विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून त्यांचे गुण व आवडीनुसार योग्य महाविद्यालय व शाखा निवडण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

25 JUN 2026

पुढारी

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेवर शनिवारी मार्गदर्शन

**कोल्हापूर :** अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थी आणि पालकांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे शनिवारी (दि. २७) मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) येथे हा कार्यक्रम होणार आहे. या चर्चासत्रात केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ई-स्क्रुटिनी, गुणवत्ता यादी, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत, प्रवेशाच्या विविध फेऱ्या, महाविद्यालय व शाखा निवडीचे निकष तसेच शुल्क संरचना याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार असून अधिकाधिक विद्यार्थी व पालकांनी या चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्कूलचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले.

25 JUN 2026

जन प्रवास

# अभियांत्रिकी प्रवेशाबाबत २७ जूनला मार्गदर्शन

- कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे आयोजन
- विद्यार्थी, पालकांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसंदर्भात मिळणार संपूर्ण माहिती

जनप्रवास : कोल्हापूर

बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण होऊन अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी यांच्या वतीने ऑनलाईन मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेबाबत २७ जून रोजी मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्रामध्ये विद्यार्थी व पालकांना केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसंदर्भात संपूर्ण माहिती देण्यात येणार असून नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ई-स्क्रुटिनी, मेरिट लिस्ट, ऑप्शन फॉर्म भरण्याची पद्धत, प्रवेशाच्या विविध फेऱ्या, महाविद्यालय व शाखा निवडीचे निकष, शुल्क संरचना तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. चर्चासत्रात स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. गणेश पाटील मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती स्कूलचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी दिली.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) येथे शनिवार २७ जून रोजी सकाळी १०.३० वाजता हे मार्गदर्शन चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

2 5 JUN 2026
· तरुण भारत

## पदवी, पदव्युत्तरच्या ७८० अभ्यासक्रम निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील बुधवारी ७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ७८० अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर झाले आहेत. बुधवारी विविध १५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५७ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षेसाठी ३९६८ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.